# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**2023**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** दिनांक १५.०६.२०२३

**चोरीची मोटर सायकल वापरुन महिलांच्या गळयातील सोन्याचे दागिणे जबरीने खेचुन नेणा-या चोरटयांना गुन्हे शाखा कक्ष ०२, पनवेल यांनी केले जेरबंद**

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हदिद्मध्ये काही अज्ञात आरोपी हे मोटर सायकल वरून येवून महिलांच्या गळयातील सोन्याचे किंमती व मौल्यवान दागिणे जबरीने खेचुन चोरी करून घेवून जात असल्याबाबत अनेक गुन्हे दाखल आहेत.

नागरीकांसाठी सोन्याचे दागिणे हा भावनिक विषय असतो. आरोपींनी अशा प्रकारे सोन्याचे दागिणे जबरीने खेचुन नेणे अशा गंभीर गुन्हयांची तात्काळ उकल करण्याबाबत पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय मोहिते, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) अमित काळे, विनायक वस्त, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांनी आदेशीत केले होते.

अशा प्रकारचे गुन्हयांमध्ये आरोपी हे त्यांच्याकडील मोटर सायकल वरून अचानक येवून क्षणाचा ही विलंब न घालविता महिलांचे गळयातील सोन्याचे दागिणे जबरीने खेचुन नेत असल्याने अशा आरोपींबाबत फिर्यादी व साक्षीदारांकडे विचारपुस करताना खुप मर्यादा येतात. त्यामुळे सदरचे गुन्हे उघडकीस आणने पोलीसांना अतिशय आव्हानात्मक होते.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र वि. पाटील, गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने नवी मुंबई, ठाणे, मुंबई तसेच मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयामध्ये घडलेल्या गुन्हयांची माहिती प्राप्त केली. घडलेल्या गुन्हयांचे घटनास्थळी जावून फिर्यादी, साक्षीदार यांना भेटुन तसेच घटनास्थळावरील प्राप्त सीसीटिव्ही. फुटेजचे सखोल तपासणी करून आरोपींबाबत जास्तीत जास्त माहिती संकलीत करून अशा प्रकारचे गुन्हे करणारी काही ठराविक आरोपींची टोळी सक्रिय झाली असल्याची खात्री केली.

गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे पथकाने गुन्हा घडल्याची वेळ, घटनास्थळी आरोपी येण्याजाण्याचा मार्गावरील सीसीटिव्ही. फुटेजची तपासणी तसेच गोपनिय बातमीदाराकडुन माहिती प्राप्त करून गुन्हे शाखा कक्ष २, पनवेलचे पोउपनि. मानसिंग पाटील व पथकाने कळंबोली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ९०/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ या गुन्हयांमध्ये खालील आरोपीस अटक केली.

**अटक आरोपी - केवीन उर्फ मोहम्मद सादक जाफरी, वय २१ वर्षे, रा. झेंडेवाला बाबाजवळ, श्रीलंका, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे**

नमुद आरोपीस अटक करून आरोपीकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात ५०,०००/- रूपये किंमतीचे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जप्त करून खालील प्रमाणे चेन स्नॅचिंगच व मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | कळंबोली पोलीस ठाणे, नवी मुंबई | ९०/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| २ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २२२/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| ३ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | १७६/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| ४ | खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई | १३३/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| ५ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | १२८/२०२३ भा.द.वि. कलम ३९२, ३४ |
| ६ | नारपोली पोलीस ठाणे, ठाणे शहर | ४१८/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ |

तसेच वर नमुद पथकाने रबाळे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २२८/२०२३ भा.द.वि. कलम ३९२,३४ मधील पाहिजे आरोपी **हाथी उर्फ कैलास कमलबहाद्दूर नेपाळी, वय-२४ वर्षे, रा.दिनेश क्षिरसागर यांची चाळ, रुम नं. ०२, खांदा, नेरळ, ता.कर्जत जि. रायगड** याचेबाबत गोपनिय बातमीदाराकडुन माहिती प्राप्त करून त्याचेवर सतत निगराणी ठेवून सापळा रचुन त्यास शिताफिने ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या सखोल चौकशीत खालील प्रमाणे चेन स्नॅचिंगचे व मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ३०/२०२२ भा.द.वि. कलम ३९२, ३९५, १२०(ब), ३४ सह मोक्का कायदा कलम ३(१) (II), ३(२), ३(४) |
| २ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २२८/२०२३ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ३ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २३७/२०२३ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ४ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ३२/२०२२ भा.द.वि. कलम ३७९,३४ |
| ५ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ०४/२०२२ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ६ | रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई | १७/२०२२ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ७ | वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई | २९/२०२२ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ८ | NRI सागरी पोलीस ठाणे, नवी मुंबई | ०४/२०२२ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| ९ | तळोजा पोलीस ठाणे, नवी मुंबई | ३०/२०२२ भा.द.वि. कलम ३९२,३४ |
| १० | सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई | १४४/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ |
| ११ | कामोठे पोलीस ठाणे, नवी मुंबई | २२१/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ |

सदरची उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष ०२, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सपोनि संदिप गायकवाड, प्रविण फडतरे, पोलिस उप निरीक्षक मानसिंग पाटील, वैभव रोंगे, पो.हवा. तुकाराम सूर्यवंशी, दिपक डोंगरे, रणजित पाटील, सचिन पवार, अनिल पाटील,अजित पाटील, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, पो.शि. संजय पाटील, विक्रांत माळी यांनी केली आहे.

--------------